














सेवावर्धिनी

# सेवावार्ता

अंक ५

२०२५-२६

सेवावर्धिनी - एक विश्वासार्ह सहकारी

# अनुक्रमणिका


१. प्रस्तावना

२. सामाजिक संस्था आणि त्यांचे कार्य -

२.१ नवचेतना सर्वांगीण विकास केंद्र

२.२ इंडिया हाऊस

३. उपजीविकेचे साधन -

३.१ दुग्ध व्यवसाय

४. सामाजिक संस्थांसाठी महत्वाचे -

४.१ प्रभावी वार्षिक सर्वसाधारण सभा (AGM) : संस्था सुशासनाची गुरुकिल्ली

५. सेवाव्रती -

५.१ संजीवनी केळकर

५.२ अनुराधा भोसले

६. सेवा वार्ता -

६.१ सहयोगी संस्थांसाठी संधी, संसाधने आणि सहयोगाचे व्यासपीठ – सेवावर्धिनी

# प्रस्तावना

## अक्षरांचा अर्घ्य

सेवा आणि सेवाभावाच्या पवित्र ऊर्जेने ओतप्रोत भरलेला 'सेवा वार्ता'चा हा पाचवा अंक कृतार्थतेचा परमानंद आणि कृतज्ञता व्यक्त करणारी साद आहे.

सेवा आणि दान या दोन्ही शब्दांचे अर्थ वेगवेगळे आहेत. अर्थात दोन्ही गोष्टी आपल्याला सहजतेने करता येतात. सेवा मनापासून करणे हे दान करण्याइतपतच पुण्याचे असते. सेवा करण्यासाठी प्रत्येकवेळी कोठे बाहेर जावे लागते असे नाही, आपण घरात राहूनही सेवा करू शकतो.

असाच या अंकातील महत्त्वाचा घटक म्हणजे सेवावर्धिनीचे सुरू असलेले 'एक मुठी अनाज अभियान.' हे अभियान लोकसहभागातून संवेदनशीलतेने राबविले जात आहे. सध्या अनेक वृद्धाश्रम, अनाथालये, निवासी शाळा आणि इतर निवासी संस्था मर्यादित साधनसंपत्तीमुळे त्यांच्या दैनंदिन अन्नाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी संघर्ष करत आहेत. या पार्श्वभूमीवर हे अभियान अन्नधान्याचे महत्त्व अधोरेखित करत आहे. हे अभियान पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील लोकसहभागाचे एक यशस्वी मॉडेल म्हणून विकसित झाले आहे. या प्रयत्नांमुळे अन्नसुरक्षेची सक्षम आणि शाश्वत व्यवस्था निर्माण होत आहे.

एका बाजूला सेवेचे हा यज्ञकुंड धगधगत असताना दुसरीकडे वैयक्तिक पातळीवर काम सुरू करून त्याचे संस्थात्मक रुपात परिवर्तन झाल्याची उदाहरणे आहेत. समाजातील वंचित घटकांपर्यंत सेवेबरोबर सामाजिक दायित्वाचा संदेश या निमित्ताने जात आहे. मूळच्या नगर जिल्ह्यातील अनुराधाताई भोसले यांनी वंचितांच्या घरात शिक्षणाची गंगा नेली आहे. कोल्हापूरच्या लाल मातीत आणि वीटभट्ट्यांच्या धुराड्यात वंचितांच्या मुलांचे भविष्य शोधणाऱ्या, बालमजुरीच्या दलदलीतून हजारो कोवळ्या हातांना पाटी-पेन्सिल पकडायला शिकवणाऱ्या अनुराधाताईंचे संपूर्ण आयुष्य म्हणजे दुःखातून उगम पावलेली प्रेरककथा आहे.

शहरातील सर्व सुबत्ता, वैभव आणि उच्च वैद्यकीय पदवी बाजूला सारून ग्रामीण भागातील दारिद्र्य, दुष्काळ आणि अंधाराशी दोन हात करण्याचे धारिष्ट्य मोजकेच करू शकतात. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्याच्या कोरड्या, दुष्काळी मातीला आपल्या मायेने आणि कष्टाने सुजलाम् सुफलाम् करणाऱ्या डॉ. संजीवनी केळकर यांनी प्रतिकूलतेवर मात करून माणुसकीचा नवा अध्याय लिहिला आहे.

दुग्ध व्यवसाय हा ग्रामीण उपजीविकेचा शाश्वत राजमार्ग आहे. देशात धवल क्रांती मोठ्या प्रमाणावर झाली असून त्यातून ग्रामीण भागातील रोजगाराला चांगलीच चालना मिळालेली आहे. जगातील एकूण दूध उत्पादनात भारताचा २३ टक्के वाटा आहे. महाराष्ट्र दूध उत्पादनात देशात सहाव्या क्रमांकावर आहे. दुग्ध व्यवसाय हा ग्रामीण भागातील शेतकरी, मजूर यांच्यासाठी स्वयंरोजगार म्हणून किफायतशीर आहे. भारतात खऱ्या अर्थाने १९७० पासून तंत्र शुद्ध पद्धतीने आणि सहकारी तत्त्वावर दुधाचा व्यवसाय सुरू झाला.

देश हमे देता हैं सबकुछ हम भी कुछ देना सिखे...या उक्तीप्रमाणे काही संस्था कार्यरत आहेत. देशासाठी उत्तम नेतृत्त्व उभारणासाठी काम करणाऱ्या संस्थांमध्ये अग्रभागी आहे ती 'इंडिया हाउस' संस्था. भारताला तरुणांचा देश म्हणून ओळखले जाते. हे चित्र जितके आशादायी आहे, तितकीच त्याच्या मागची आव्हानेही मोठी आहेत.

समाजात सकारात्मकतेने डोकावून पाहिल्यास अनेक चांगल्या गोष्टी आपल्या आसपास सुरू आहे, याची प्रचिती येते. तीच आपली शाश्वत प्रेरणा आहे. सेवा करण्यासाठी यातून ऊर्जा मिळते. सेवा आणि सेवाभावाचा हा यज्ञ असाच अविरत धगधगत राहो, हीच या अंकाच्या निमित्ताने सदिच्छा.

**- सोमदत्त पटवर्धन**
**कार्यवाह, सेवावर्धिनी**

# 2. सामाजिक संस्था आणि त्यांचे कार्य

## 2.1 - संघर्षातून उगम पावलेली 'नवचेतना'

## वेदना ते विकास - 'नवचेतना' संस्थेचा मराठवाड्याच्या मातीत सामाजिक क्रांतीचा धगधगता प्रवास






मराठवाडा म्हणजे दुष्काळ, स्थलांतर आणि शेतकरी आत्महत्या यांसारख्या गंभीर आव्हानांनी होरपळलेला प्रदेश. पण याच मातीत, केवळ परिस्थितीवर अश्रू न ढाळता, बदलाचे एक नवे वादळ आकारास आले. २००८ साली स्थापन झालेली 'नवचेतना सर्वांगीण विकास केंद्र' ही गैर-धार्मिक, गैर-राजकीय आणि नफाविरहित संस्था आज उपेक्षित आणि वंचित घटकांसाठी आशेचा एक नवा किरण ठरली आहे.

या संस्थेची पायाभरणी अत्यंत खडतर संघर्षातून झाली आहे. बालविवाह आणि तीव्र घरगुती हिंसाचाराच्या वेदना स्वतः सहन करणाऱ्या मनीषा घुले यांनी आपल्या आयुष्यातील याच वेदनेचे रूपांतर एका ध्येयात केले. त्यांनी 'नवचेतना'ची स्थापना करून मराठवाड्यातील ऊसतोड कामगार, वीटभट्टी मजूर, महिला, मुले आणि अल्पभूधारक शेतकरी यांच्या सक्षमीकरणाचा विडा उचलला. आज बीड जिल्ह्यासह मराठवाड्याच्या सर्व ८ जिल्ह्यांमध्ये संस्थेने आपल्या कामाचा विस्तार केला असून, मानवी कल्याणासाठी ही संस्था अहोरात्र झटत आहे.

'नवचेतना'च्या प्रत्येक उपक्रमाच्या केंद्रस्थानी महिला आहेत. महिला केवळ कुटुंबाचाच नव्हे तर संपूर्ण समाजाचा कणा आहेत, या विश्वासाने संस्था त्यांच्या रोजगार, आरोग्य, शिक्षण आणि निर्णयक्षमतेवर काम करते.गरिबी आणि स्थलांतराचे दुष्टचक्र तोडण्यासाठी संस्थेने महिलांना शिवणकाम, दुग्धव्यवसाय आणि ब्युटी पार्लर यासारख्या क्षेत्रांत उत्पन्न निर्मितीचे प्रशिक्षण दिले. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत ७,३६० महिलांना प्रशिक्षित करण्यात आले असून, त्यातील ५,६४० महिलांनी स्वतःचे यशस्वी व्यवसाय सुरू केले आहेत.

महिलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य जपण्यासाठी विशेष आरोग्य शिबिरे आणि मासिक पाळी व्यवस्थापनावर सातत्याने जागृती केली जाते.समाजातील परितक्त्या, विधवा किंवा एकल महिलांना कायदेशीर मदत, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत, त्यांना स्थानिक प्रशासनात आपले हक्क मिळविण्यासाठी सक्षम केले जात आहे.

मराठवाड्यातून रोजगारासाठी होणारे कुटुंबांचे स्थलांतर ही एक मोठी सामाजिक समस्या आहे. हे स्थलांतर रोखण्यासाठी 'नवचेतना'ने शाश्वत उपजीविकेचे मॉडेल्स उभे केले आहेत.स्वयं-सहाय्यता गटांच्या (SHGs) माध्यमातून महिलांना पैशांचे नियोजन आणि आर्थिक साक्षरतेचे धडे दिले गेले. यामुळे तब्बल ५५ हजाराहून अधिक महिलांशी संस्थेचा थेट संपर्क झाला असून, ७ हजार पेक्षा जास्त महिला आणि त्यांच्या कुटुंबांचे रोजगारासाठी होणारे स्थलांतर थांबवण्यात संस्थेला यश आले आहे.

३० गावांमध्ये विशेष दुग्धव्यवसाय युनिट्स सुरू करण्यात आले आहेत. आज ३ हजारहून अधिक महिला या व्यवसायात सक्रियपणे कार्यरत असून, त्यांना गावातच एक स्थिर आणि सन्मानजनक उत्पन्न मिळत आहे. यामुळे कुटुंबांना गाव सोडण्याची गरज उरलेली नाही.

दुष्काळी मराठवाड्यात शेती आणि पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. यावर 'नवचेतना'ने अत्यंत पद्धतशीर आणि वैज्ञानिक पद्धतीने काम सुरू केले आहे. रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या विळख्यातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी संस्था काम करत आहे. सेंद्रिय शेती प्रशिक्षण आणि मृदा (माती) परीक्षणासारख्या उपक्रमांमुळे शेतकऱ्यांचा खर्च कमी झाला आहे. सध्या ३० गावांमधील ७८५ शेतकरी या आधुनिक व पर्यावरणपूरक पद्धतीचा लाभ घेत आहेत. गटशेती आणि मॉडेल शेतीला प्रोत्साहन देऊन अन्न सुरक्षा वाढवली जात आहे.

पाणी हेच जीवन आहे, हे ओळखून १०० गावांमध्ये ५,३३५ नागरिकांच्या थेट सहभागातून जलसंवर्धनाची कामे करण्यात आली. यामध्ये सिमेंट नाला बांध, शोषखड्डे आणि वनराई बंधारे बांधून भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवण्याचे प्रयत्न यशस्वी झाले आहेत.

शेतीसोबतच निसर्गाचा समतोल राखण्यासाठी 'नवचेतना'ने लोकसहभागातून मोठी वृक्षलागवड मोहीम राबविली आहे. संस्थेच्या पुढाकारातून आतापर्यंत ४ लाख झाडांची लागवड करण्यात आली आहे.

या मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये ५० गावांचा थेट सहभाग असून ५ हजारहून अधिक महिला आणि कुटुंब या झाडांची केवळ लागवडच करत नाहीत, तर पोटच्या लेकरासारखी त्यांची काळजी घेत आहेत. या कृषी-वनीकरणामुळे स्थानिक पातळीवर निसर्गाचे रक्षण आणि शाश्वत उपजीविकाही निर्माण होत आहे.






पालकांच्या स्थलांतराचा सर्वात मोठा फटका निष्पाप मुलांच्या शिक्षणाला बसतो. 'नवचेतना'ने या मुलांचे भविष्य अंधारात जाण्यापासून वाचवले आहे. वंचित आणि दुर्गम वस्त्यांमध्ये राहणाऱ्या मुलांसाठी संस्थेने 'वस्ती शाळा' सुरू केल्या. या माध्यमातून २७० मुलांना सरकारी शाळांच्या नियमित शिक्षण प्रवाहात समाविष्ट करण्यात आले आहे.

ऊसतोडणी किंवा वीटभट्टीवर जाणाऱ्या स्थलांतरित कुटुंबातील मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये, म्हणून संस्थेने निवासी शाळा (Hostel Model) सुरू केली आहे. सध्या ३०० हून अधिक विद्यार्थ्यांना या निवासी शाळेत निवास, पोषक आहार आणि दर्जेदार शिक्षण मोफत दिले जात आहे.

एक दशकाहून अधिक काळ 'नवचेतना सर्वांगीण विकास केंद्रा'ने मराठवाड्याच्या दुर्गम भागात केलेले काम मूक क्रांती आहे. जलसंवर्धन, शाश्वत शेती, पर्यावरण, बालकांचे शिक्षण आणि महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य या सर्वच आघाड्यांवर संस्थेने काम केले आहे.

वेदनेमधून जन्मलेल्या या संस्थेने आज हजारो कुटुंबांच्या आयुष्यात आनंदाची 'नवचेतना' निर्माण केली आहे. एका समतापूर्ण, न्याय्य आणि स्वावलंबी समाजाच्या निर्मितीसाठी नवचेतनाचा हा यज्ञ असाच सुरू राहणार आहे.

वेबसाईट : www.navchetanaorg.in

# सामाजिक संस्था आणि त्यांचे कार्य

## 2.2. इंडिया हाउस

## देशाच्या पद्धतशीर बदलासाठी 'नेतृत्व, पायाभूत सुविधांची' उभारणी

इंडिया हाउसची गरज का आहे?

आपला देश महत्त्वाच्या आणि निर्णायक वळणावर उभा आहे. जगातील सर्वांत तरुण लोकसंख्या, वेगाने झेप घेणारी अर्थव्यवस्था आणि जागतिक पटलावर सातत्याने उंचावणारा आपला आवाज... हे सगळेच देशाच्या उज्ज्वल भविष्याची साक्ष देतात. परंतु हे चित्र जितके आशादायी आहे, तितकीच त्याच्या मागची आव्हानेही मोठी आहेत. सुशासन असो, तळागाळातील लोकांपर्यंत सार्वजनिक सेवा पोहोचवणे असो, संस्थांची कार्यक्षमता वाढवणे असो, शाश्वत विकास असो की सामाजिक उन्नती, या प्रत्येक आघाड्यांवर देशाला गरज आहे ती विचारशील, दूरदृष्टी असलेल्या आणि सक्षम नेतृत्वाची.

राष्ट्रनिर्मितीची स्वप्न पाहणाऱ्या हजारो तरुणांची फौज देशात उभी आहे, सार्वजनिक जीवनात भरीव योगदान तरुणाईला द्यायचे आहे. तरुणाईच्या ऊर्जेला योग्य दिशा देऊन, दीर्घकालीन नेतृत्व म्हणून घडविणारे मार्ग आज अत्यंत मर्यादित आणि विखुरलेले आहेत. नेमकी हीच दरी सांधण्यासाठी आणि तरुणांच्या ऊर्जेला राष्ट्रकार्याशी जोडण्यासाठी 'इंडिया हाउस'ची स्थापना झाली आहे.

क्रिकेट मॅचमधून जन्माला आलेली ही क्रांतीकारी गोष्ट रंजक आहे. एकदा क्रिकेटच्या विश्वचषकाचा सामना पाहत असताना, काही तरुणांचे विचार खेळाच्या मैदानापलीकडे गेले. मैदानावर देशाचे प्रतिनिधित्व करणारे खेळाडू ज्या एकाग्रतेने, जिद्दीने आणि दबावाखालीही कोट्यवधी देशवासियांच्या आशा-आकांक्षांचे ओझे खांद्यावर घेऊन खेळतात, ते पाहून हे तरुण थक्क झाले. तिथे सामायिक उद्देश असतो. आपल्या देशाचा विजय या संकल्पनेतूनच एका विचाराने जन्म घेतला. हा एकजुटीचा, जबाबदारीचा आणि सामायिक उद्देशाचा भाव फक्त खेळापुरताच का मर्यादित राहावा?






ज्यांच्या मनात राष्ट्रनिर्मितीची तीव्र ओढ, वचनबद्धता आणि जबाबदारीची जाणीव आहे, अशा विविध क्षेत्रांतील माणसांना एकत्र आणणारे एखादे व्यासपीठ आपल्याकडे का नसावे? अशा मंथनातून आकारास आली 'इंडिया हाऊस'ची संकल्पना.

भारताला प्रगतीपथावर नेण्यासाठी नागरिक 'देश उभारणीच्या' एकाच ध्येयाने एकत्र येतात. या प्रवासाचे सारथ्य करत आहेत श्री. कुमार शुभम (सीईओ आणि सह-संस्थापक, इंडिया हाउस). आयआयटी दिल्लीचे माजी विद्यार्थी असलेल्या कुमार शुभम यांच्याकडे तंत्रज्ञान, सुशासन आणि सामाजिक विकास क्षेत्रातील अनुभव आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली ही टीम नव्या कल्पनांवर विचार विनिमय, मूल्यमापन करून प्रत्यक्ष कृतीची जोड देत आहे. राष्ट्रनिर्मितीसाठी सक्षम आणि वचनबद्ध नेत्यांची भक्कम साखळी तयार करणे, हेच त्यांचे ध्येय आहे.

आम्ही कोण आहोत? इंडिया हाउस एक 'थिंक-अँड-डू टँक' (Think-and-Do Tank) आहे. विचारप्रवाही प्रत्यक्षात कृती करून पुढील पिढीचे नेतृत्व घडविण्यासाठी अहोरात्र झटणारी आहे. केवळ क्षमताच नाही तर उत्तम चारित्र्य असलेल्या व्यक्ती भारताचे भविष्य घडवू शकतात. नेतृत्व करण्याचे धाडस आहे आणि ज्यांचे हृदय देश उभारणीसाठी सदोदित प्रयत्नरत आहे. नेतृत्व विकास, धोरणात्मक सहभाग, संस्थात्मक बांधणी आणि एक सशक्त समुदाय निर्माण करून, भारताच्या दीर्घकालीन विकासात मोलाचे योगदान देतील अशा नेत्यांची फळी इंडिया हाउस तयार करत आहे.

या प्रवासाला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. क्रांतिकारक श्यामजी कृष्ण वर्मा यांनी १९०५मध्ये लंडनमध्ये स्थापन केलेल्या ऐतिहासिक 'इंडिया हाउस'कडून संस्थेने प्रेरणा घेतली आहे. त्या काळी इंडिया हाउस म्हणजे देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि भविष्यासाठी काही योगदान देऊ इच्छिणाऱ्या तरुण भारतीयांचे हक्काचे केंद्र बनले होते. भारताच्या इतिहासातील त्या अत्यंत संवेदनशील कालखंडात त्या वास्तूने संवाद, नेतृत्व, बौद्धिक जागृती आणि जनसेवेची भावना जोपासली. आजचे 'इंडिया हाउस' हीच जबाबदारी, नेतृत्व आणि राष्ट्रनिर्मितीची भावना घेऊन समकालीन भारताच्या गरजांनुसार काम करत आहे.



India HOUSE



इंडिया हाउसचे कार्य खालील तीन एकमेकांशी जोडलेल्या मुख्य स्तंभांवर उभे आहे. व्यक्ती, सार्वजनिक सेवा आणि राष्ट्रनिर्मितीसाठी पूर्णपणे समर्पित असणाऱ्या उदयोन्मुख तरुण नेत्यांचा शोध घेणे, त्यांच्या व्यक्तिमत्वाला पैलू पाडणे आणि त्यांना एकमेकांशी जोडणे.

### ध्येय

कल्पना, धोरणात्मक नवोपक्रम, बौद्धिक संशोधन आणि भारताच्या विकासाला गती देणाऱ्या नवनवीन उपायांना भक्कम पाठिंबा देणे. परस्परांच्या सहकार्याने आणि क्षमता वाढवून आपल्या देशातील यंत्रणा, संस्था आणि सार्वजनिक व्यवस्था अधिक मजबूत करणे.

उपक्रम -पॉलिसी पायोनियर्स प्रोग्रॅम -हा इंडिया हाउसचा ४ महिन्यांचा फ्लॅगशिप (प्रमुख) हायब्रीड लीडरशिप प्रोग्रॅम आहे. संस्था, विविध यंत्रणा आणि सार्वजनिक धोरणे समाजाला कसा आकार देतात आणि दीर्घकालीन बदल कसे घडवून आणतात, हे समजून घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी हा उत्तम मार्ग आहे. यात सहभागी होणाऱ्यांना थेट वरिष्ठ धोरणकर्ते, युएन (UN) सल्लागार, नामांकित प्राध्यापक आणि प्रत्यक्ष काम करणाऱ्या तज्ज्ञांकडून शिकण्याची आणि खऱ्याखुऱ्या धोरणात्मक आव्हानांवर काम करण्याची संधी आहे. यात तंत्रज्ञान, आरोग्य, शिक्षण, शाश्वतता, व्यापार आणि सार्वजनिक व्यवस्था व सुशासन अशा विशेष शाखा आहेत. विद्यार्थी, नोकरदार, संशोधक आणि उद्योजक एकत्र येऊन यात काम करतात. सार्वजनिक धोरण, प्रशासन आणि पद्धतशीर बदलांविषयी उत्सुकता असणाऱ्या प्रत्येकासाठी हा विनामूल्य आणि नवनवीन शिकण्यास इच्छुक असणाऱ्यांसाठी अत्यंत सोपा उपक्रम आहे. समस्यांचे उत्तर शोधणारे 'सक्रिय नागरिक' बनण्यासाठी हा कार्यक्रम प्रेरित करणारा आहे. यात तीन स्तरांवर काम चालते. स्टार्ट थिंकिंग इन पॉलिसी (सात दिवस)स्टार्ट ॲक्टिंग इन पॉलिसी (चौदा दिवस)स्टार्ट रायटिंग इन पॉलिसी (तीस दिवस)

'पॉलिसी मंडला' हे इंडिया हाउसचे साप्ताहिक धोरणात्मक न्यूजलेटर आहे. अत्यंत गुंतागुंतीच्या आणि क्लिष्ट वाटणाऱ्या धोरणात्मक कल्पनांना अतिशय रंजक, सोप्या आणि विचार करायला लावणाऱ्या भाषेत मांडण्याचे काम 'पॉलिसी मंडाला' करते. या न्यूजलेटरच्या ४२ आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या असून २ हजार ३०० हून अधिक नियमित वाचकांचा समुदाय याच्याशी जोडला गेला आहे.

**policymandala.theindiahouse.org**

केवळ १८ महिन्यांच्या अल्पशा कालावधीत इंडिया हाउसने तरुण नेते, धोरणकर्ते आणि बदल घडवू इच्छिणाऱ्यांचा मोठा परिवार तयार केला आहे. पॉलिसी चॅलेंजेसने पाच हजार हून अधिक तरुणांचा सहभाग आणि समस्या निवारणाच्या प्रक्रियेत सक्रिय केले. पॉलिसी पायोनियर्स प्रोग्रॅम ३हजार १०० पेक्षा जास्त अर्ज आले, यातून  उदयोन्मुख धोरण नेत्यांचा सक्रिय गट तयार झाला. कॅम्पस लीडरशिप प्रोग्रॅम्स देशातील प्रमुख तांत्रिक आणि शैक्षणिक संस्थांमधील २हजार ५०० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत थेट पोहोचला. भारत मंडलाने वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्या १ हजार ६०० पेक्षा जास्त समाजपरिवर्तकांना एका व्यासपीठावर आणले. पॉलिसी मंडला सुशासन आणि विकासात रुची असणाऱ्या ३ हजार ५०० हून अधिक वर्गणीदारांचा वाचकवर्ग तयार केला.

भारतासाठी एक दीर्घकालीन नेतृत्व, पायाभूत सुविधा  तयार करत आहे. येणाऱ्या वर्षांमध्ये हजारो तरुण नेत्यांना घडविणे, नागरी सहभाग वाढवणे आणि देशाला अधिक सक्षम, संवेदनशील आणि भविष्यासाठी सज्ज बनवणे हेच संस्थेचे उद्दिष्ट आहे.

या महायज्ञात तुम्ही विद्यार्थी, व्यावसायिक, उद्योजक, धोरणकर्ते, संशोधक किंवा समाजपरिवर्तक असाल तर - इंडिया हाउस तुम्हाला भारताच्या भविष्याला आकार देण्यासाठी एक हक्काचे आणि अर्थपूर्ण व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे.

**वेबसाइट:** www.theindiahouse.org
**ईमेल:** namaste@theindiahouse.org

अंतःकरणापासून समर्पित, प्रामाणिक आणि ऊर्जावान स्त्री-पुरुष एका वर्षात ते काम करू शकतात, जे एक मोठी गर्दी एका शतकातही करू शकणार नाही.

**- स्वामी विवेकानंद**

# 3. उपजीविकेचे साधन

## 3.1 दुग्ध व्यवसाय : ग्रामीण उपजीविकेचा शाश्वत राजमार्ग



भारतात दुग्ध व्यवसाय हा ग्रामीण उपजिवीकेचा शाश्वत राजमार्ग म्हणून ओळखला जातो. देशात धवल क्रांती मोठ्या प्रमाणावर झाली असून त्यातून ग्रामीण भागातील रोजगाराला चांगलीच चालना मिळालेली आहे.

भारत हा जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश आहे. एकूण उत्पादनाच्या २३ टक्के वाटा भारताचा आहे. महाराष्ट्र दूध उत्पादनात देशात सहाव्या क्रमांकावर असून २०२१-२२मध्ये राज्याचे उत्पादन ४०५.०७ लाख लिटर प्रतिदिन होते. आशियातील पहिली दुग्धशाळा १९५२मध्ये मुंबईत स्थापन झाली आणि १९५८मध्ये स्वतंत्र दुग्धव्यवसाय विकास विभाग निर्माण झाला. शेती व्यवसायाला जोडधंदा म्हणून ग्रामीण भागात अनेक व्यवसाय केले जातात. त्या पैकी दुग्ध व्यवसाय  हा ग्रामीण भागातील शेतकरी, मजूर यांच्यासाठी स्वयंरोजगार म्हणून किफायतशीर आहे. भांडवली गुंतवणूक, गाई पाळण्यासाठी जागा, चारा-पाणी याची व्यवस्था असल्यास चांगले उत्पन्न  मिळवून देणारा व्यवसाय आहे. भारतात गाई आणि म्हशीच्या दुधाला चांगली मागणी आहे. त्याचप्रमाणे शेणखत, गांडूळखत हे उत्तम प्रकारे मिळते. तसेच स्वंयपाकसाठी गोबर गॅसही मिळतो. आपल्या देशात खऱ्या अर्थाने १९७० पासून तंत्र शुद्ध पद्धतीने आणि सहकारी तत्त्वावर दुधाचा व्यवसाय सुरू झाला. याचे श्रेय डॉ. वर्गीस कुरियन यांना जाते. त्यांनी धवल क्रांती घडवून आणली. त्यांनी गुजरातमधील आणंद येथे सहकारी तत्त्वावर दुग्ध व्यवसाय सुरू केला. ते आज जगभरात AMUL (अमूल) दूध म्हणून नावाजले आहे. दरवर्षी एक जून आंतरराष्ट्रीय दुग्ध दिवस म्हणून पाळण्यात येतो.  याच सुमारास देशात संकरित गाई निर्माण करण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. या योजने अंतर्गत दूध उत्पादकाच्या दारात जास्त दूध देणाऱ्या गाई आल्या. गांवपातळीवर सावकारीला आळा बसेल आणि गावात आर्थिक चलन देणारा व्यवसाय असा हक्काचा व्यवसाय सुरु झाला.

### दुग्ध व्यवसायाचे महत्त्व

१. शेतीला शाश्वत जोडधंदा : शेतीपूरक व्यवसायामध्ये दुग्ध व्यवसाय पूर्वीपासून महत्त्वाचा आहे. आधुनिक तंत्राने केला तर हा शाश्वत आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरतो.

२. रोजगार निर्मिती : देशातील आठ कोटी अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी कुटुंब हा व्यवसाय करतात, ज्यामध्ये महिलांचा वाटा ७०-८० टक्के आहे.

३. पोषण सुरक्षा : प्रत्येकाला प्रतिदिनी ३०० मि.ली. दुधाची गरज असते. गाईच्या १ लिटर दुधातून ६०० किलो कॅलरीज तर म्हशीच्या दुधातून १००० किलो कॅलरीज मिळतात.

### महाराष्ट्रातील सद्यःस्थिती

- दूध संकलन : जुलै-२०२३ अखेर राज्यात १३४.१९ लाख लिटर प्रतिदिन दूध संकलन होते. यात सहकार क्षेत्र ३८.३५ लाख लिटर आणि खासगी क्षेत्र ९५.८४ लाख लिटर.
- गाय व म्हैशीचे दुधाचे प्रमाण : महाराष्ट्रात गायीचे दूध म्हशीच्या तुलनेत जास्त आहे. गायीच्या दुधात स्निग्धांश ३.५/८.५ तर म्हशीच्या दुधात ६.०/९.० असतो.
- धवलक्रांतीचा परिणाम : १९७० नंतर दुधाचे उत्पादन १० पट वाढून वर्षाला २१ कोटी टन झाले. दरडोई वापर १०७ ग्रॅम वरून ४२७ ग्रॅम झाला.

### दुग्ध व्यवसाय कसा सुरू करावा?

शेतीपूरक व्यवसायात दुग्ध व्यवसाय हा परंपरागत चालत आलेला महत्त्वाचा व्यवसाय आहे. दुग्ध व्यवसायसाठी प्रामुख्याने संकरित गाई, गावठी दुधाळ गाई आणि दुधाळ म्हशी पाळतात. प्रचलित दुग्ध व्यवसाय करण्यापेक्षा आधुनिक तंत्राने व व्यावसायिक पद्धतीने हा व्यवसाय केला असता निश्चितपणे शाश्वत व्यवसाय असून आर्थिकदृष्ट्या परवडतो. आहारदृष्ट्या प्रत्येकाला प्रतिदिनी ३०० मिली दुधाची गरज भासते. वाढत्या लोकसंख्या वाढीच्या दृष्टीने दुधाचे उत्पादन वाढणे आवश्यक आहे. आपल्याकडे गाईपासून ४५ तर म्हशीपासून ५२ टक्के दूध मिळते. तथापि सध्या परिस्थिती बदलेली आहे. आता जास्तीत जास्त दूध उत्पादन गाईपासून मिळत. गाईपासून मिळणाऱ्या दुधातून फॅट्स कमी मिळतात त्यामुळे दुधाला दरही म्हशीच्या दुधापेक्षा कमी मिळतो. दुधामध्ये पाणी, कार्बोदक, क्षार, आवश्यक जीवनसत्व भरपूर प्रमाणात असल्याने दूध हे पूर्ण अन्न म्हणतात. गाईच्या १ लिटर दुधातून ६०० तर म्हशीच्या दुधातून १००० किलो कॅलरी मिळतात. फायदेशीर दुग्धव्यवसायासाठी म्हणजे जात, वंश लक्षात घेऊनच दुधाळ गाय आणि म्हशीची निवड करावी. दुधाळ गाईची खास वैशिष्ट्ये असतात. साधारण हवामानाला पोषक आणि, जास्त दूध देणारी, निरोगी, वर्षाला एक वेतणाऱ्या उत्कृष्ट जातीवंत गाई- म्हशी निवडाव्यात. दुग्ध व्यवसायसाठी नेहमी दुसऱ्या किंवा तिसऱ्या वेताच्या गाई-म्हशी निवडव्यात. त्यांचं वय ३ ते ४ वर्षाचे असावे. दुग्ध व्यवसायसाठी जर्सी, होस्टीन - फ्रिजयन, देवणी, गीर, सिंधी, थारपरकर या गाई पाळव्यात. तसेच दिल्ली, मुऱ्हा, पंढरपूरी, जाफ्राबादी, मेहसाणा म्हशी पाळव्यात एका वितात गाईने ३६०० व म्हशीने २५०० लिटर दूध दिले तर व्यवसाय फायदेशीर होतो.





- प्रमाण : व्यवसाय लहान, मध्यम किंवा मोठ्या प्रमाणावर सुरू करता येतो. मोठ्या प्रमाणासाठी २० लाख खर्च व किमान ३० दुभती जनावरे लागतात, जी २५०-३०० लिटर दूध देतील. मध्यम स्तरासाठी ७-१० लाख व १५-१८ जनावरे, तर लहान स्तरासाठी १-१.५ लाख व ५-१० जनावरे पुरेशी.
- जनावरे खरेदी : चांगल्या जातीची, जास्त दूध देणारी जनावरे प्राणी मेळ्यातून किंवा https://epashuhaat.gov.in/ या सरकारी पोर्टलवरून खरेदी करता येतात.
- आवश्यक बाबी : १ हेक्टर ओलिताखालील जमीन, पिण्याचे पाणी, वीज, रस्ता, गोठा, शहर १०-२० किमी अंतरावर, जवळ पशुवैद्यकीय दवाखाना असणे गरजेचे.

• गोठा : गाई म्हशींचा गोठा आदर्श असावा. गोठ्यात १६ किंवा अधिक जनावर असतील तर शेपटीकडे शेपटी, आणि मध्ये दोन मीटरचे अंतर हवे. गोठा साधारण उत्तर-दक्षिण असावा म्हणजे हवा खेळती राहते. मलमूत्र संग्रहित करण्यासाठी नाली काढावी. पिण्याच्या पाण्यासाठी स्वच्छ जागेत, उंचावर हौद बांधावा. नेहमी पिण्याचे पाणी निर्जंतूक असावे आणि वैरणीसाठी जनावरांसमोर पुरेशी जागा (गव्हाण) असावी. गाई-म्हशीना त्यांच्या वजनाच्या ३ टक्के वाळलेला आणि हिरवा चारा रोज द्यावा. दुभत्या जनावरांसाठी शरीराला पोषक, प्रथिन, क्षार युक्त व दूध वाढीसाठी असणारे पशुखाद्य देण्यात यावे. म्हणजे दुधातील घनपदार्थ आणि फॅट्स वाढतात. जैविक दूध प्राप्तीसाठी शक्यतो निर्जंतुकीकरण केलेला चारा आणि दाणा मिश्रण द्यावे. दूध वाढीसाठी गूळ आणि लवण युक्त चाटण गोटा चाटवावा. शक्यतो दूध काढण्याच्या वेळा नियमित असाव्यात. गाई-म्हशींमध्ये संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव जास्त होतो, विशेष करून पावसाळ्यात. जंत, लाऱ्या खूळवत, तोंड येणे, स्तन दाह होणे, खुरी याचा त्रास होतो. यासाठी सर्व प्रथम जनावरांचे लसीकरण आणि विमा करणे आवश्यक आहे. वेळोवेळी उपचार करणे, काळजी घेणे व आवश्यक वाटत असल्यास पशुवैद्यकीय मदत घेणे गरजेचे आहे. शक्यतो वेताच्या वेळेस पशुवैद्यकीय अधिकारी सोबत ठेवणे गरजेचे आहे .

• दुधाचे विपणन - दूध हा नाशवंत पदार्थ असल्यामुळे त्याचे संकलन अति सुरक्षित ठिकाणी करणे गरजेचे असते. दुधाला थंड भांड्यात संग्रहित करावेत. आजच्या घडीला ग्रामीण स्तरावर महिलांचे स्वयंसहायता गट, उत्पादक गट आणि प्रभागावर शेतकरी उत्पादक कंपनी तयार झाल्या आहेत. यांच्या मार्फत ग्रामीण स्तरावर संकलन केंद्र उभे करून दूध संकलन करता येते. दूध संकलन करताना दुधातील फॅटस् आणि एसएनएफ लॅक्टोमीटरने तपासून घ्यावे. जेणेकरून दुधाला चांगला दर मिळू शकतो. गाईमध्ये ३.५/८.५ आणि म्हशीमध्ये ६/९.५ फॅटस् आणि एसएनएफ बघितले जाते. तत्पूर्वी गावातील कुटुंब सर्वेक्षण करून गावात आणि आजबाजूच्या गावात किती दूध उत्पादित होईल त्या प्रमाणे संकलन केंद्र आणि छोट्या स्तरावरचा शीतकरण केंद्र (चिलिंग प्लँट) उभा करता येईल जेणे करून दुधाचे होणारे नुकसान, वाहतूक खर्च टाळता येईल. दुधाचे विपणन करीत असताना पुरवठा साखळी आणि मूल्यवर्धन साखळी मजबूत करणे गरजेचे आहे. जेणेकरून पुरवठा केल्यानंतर उर्वरित दुधाचे मूल्यवर्धन करता येईल. दही, ताक, लोणी, तूप, पनीर, खवा असे मूल्यवर्धित पदार्थ सुद्धा करता येतील, जेणे करून दुध उत्पादकाला उत्पादक कंपनीकडून आर्थिक फायदा होईल. तसेच बरोबरीने जैविक दुध A१, A२ विकता येईल. प्रभागामध्ये दहा हजार लिटरपेक्षा जास्त दूध संकलित होत असल्यास शीतकरण केंद्र उभारता येईल.




गाई आणि म्हशीच्या शेण आणि मलमूत्रपासून शेतीमध्ये खूप नफा होतो. शेणखत, बायोगॅस, गांडूळखत, शेणापासून गवरी, शेणोली प्लँट तयार करता येतो .

उत्पादन : साधारण एका गाईपासून वर्षाला, दूध, कालवड आणि शेणखत या पासून एक ते दीड लाख उत्पन्न मिळू शकते.

### आव्हाने आणि संधी

पूर्वीच्या शेतीला जोडधंदा असलेला हा व्यवसाय आता मुख्य व्यवसाय बनला आहे. मात्र नोटाबंदी, कोरोनासारख्या संकटांमुळे अनेक व्यावसायिकांना अडचणी आल्या. तरीही दूध हे शेतकऱ्यांचे 'एटीएम (All Time Money)' आहे. दैनंदिन गरजा दुधाच्या पैशांतून भागतात.

### यशाची गुरुकिल्ली

भूमाता चारा देते तर गोमाता शेण-मूत्र देते. दोघी एकमेकींशिवाय राहू शकत नाहीत. डॉ. वर्गीस कुरियन यांच्या श्वेतक्रांतीमुळे दुग्धव्यवसायाने ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा बनला आहे.

वाढती मागणी, सरकारी योजना आणि आधुनिक तंत्रज्ञान यामुळे दुग्ध व्यवसाय आज तरुणांसाठीही प्रगतीचा राजमार्ग ठरत आहे. योग्य नियोजन, जातीवंत जनावरे आणि मूल्यवर्धित उत्पादनांवर भर दिल्यास हा व्यवसाय निश्चित यशस्वी होतो.

**- नितीन पोंक्षे**

माजी State Agriculture Consultant, MSRLM
आणि ४० वर्षांचा शेती, उपजीविका व पर्यावरण क्षेत्रातील
अनुभव असलेले ज्येष्ठ कृषी तज्ज्ञ.

### संदर्भ सूची

१. दुग्धव्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र राज्य
Department of Animal Husbandry and Dairying, Govt. of Maharashtra
महाराष्ट्रातील दूध उत्पादन, संकलन, दुग्धशाळा स्थापना, १९५२ व १९५८मधील इतिहास.

२. डेअरी फार्मिंग व्यवसाय कसा सुरू करावा – http://MarathiUdyojak.com*
व्यवसायाचे प्रमाण, भांडवल, जनावरांची संख्या
मोठा स्तर: २० लाख, ३० जनावरे, २५०-३०० लिटर दूध
मध्यम व लहान स्तराचा खर्च व जनावरे
जनावरे खरेदीसाठी http://epashuhaat.gov.in पोर्टल

३. Milk business: दूध पूरक व्यवसाय – कृषी जागरण मराठी
डॉ. झिने प्रविण लहाणू, डॉ. गजेंद्र कों. लोंढे, प्रा. सचिन ना. वायचाळ यांचा लेख
दुग्ध व्यवसाय हा शेतीचा पूरक ते मुख्य व्यवसाय कसा झाला, धवलक्रांती, डॉ. वर्गीस कुरियन यांचे योगदान

४. दुग्ध व्यवसाय आहे प्रगतीचा राजमार्ग – ॲग्रोवन डॉ. भास्कर गायकवाड (प्रसिद्धी ०७ एप्रिल २०२३)

# 4 . सामाजिक संस्थांसाठी महत्वाचे -

## 4.1 - प्रभावी वार्षिक सर्वसाधारण सभा (AGM): संस्था सुशासनाची गुरुकिल्ली

संस्थेची रीतसर नोंदणी झाल्यानंतर तिच्यावर अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या येऊन पडतात. त्यापैकीच एक अत्यंत महत्त्वाची आणि कायद्याने बंधनकारक असलेली जबाबदारी म्हणजे 'वार्षिक सर्वसाधारण सभा' (Annual General Meeting - AGM). ही सभा केवळ एक कायदेशीर औपचारिकता किंवा वैधानिक गरज नाही, तर संस्थेच्या निकोप, पारदर्शक आणि सुदृढ संचालनासाठी एक उत्तम माध्यम आहे. संस्थेची उद्दिष्टे आणि कामाचा आलेख सर्व सभासदांसमोर मांडण्याची ही एक उत्तम संधी असते.या महत्त्वाच्या सभेचे नियोजन आणि संचालन कसे असावे, याचा हा सविस्तर आढावा.




### सभेची पूर्वतयारी

सभेच्या प्रत्यक्ष तारखेच्या किमान दोन महिने आधी कार्यकारी मंडळ किंवा विश्वस्त मंडळाच्या बैठकीत याविषयी सविस्तर चर्चा होणे गरजेचे आहे. घाईघाईने घेतलेली सभा गोंधळ निर्माण करू शकते, म्हणूनच पूर्वतयारीला खूप महत्त्व आहे. सभेची दिनांक, वेळ आणि स्थान आधीच निश्चित करावे. शक्यतो रविवार किंवा शासकीय सुट्टीचा दिवस निवडावा, त्यामुळे जास्तीत जास्त सभासदांना उपस्थित राहणे सोयीचे होऊ शकते. संस्थेच्या हिशोबाचे व लेखापरीक्षणाचे (Audit) काम केव्हापर्यंत पूर्ण होऊ शकते, याचा अंदाज अधिकृत लेखापरीक्षकाकडून (Auditor) आधीच लिहून घ्यावा.सभेत कायद्याने आवश्यक असलेल्या विषयांव्यतिरिक्त इतर काही विशेष विषयांवर चर्चा करायची असल्यास, त्याचा विचार आधीच करावा. त्या विषयावर कोण बोलणार आणि त्याला किती वेळ दिला जाणार, याचे काटेकोर नियोजन हवे.

पूर्वतयारीचा एक भाग म्हणून सर्व सभासदांची यादी काळजीपूर्वक तपासावी. संस्थेत आजीव, मानद, त्रैवार्षिक, वार्षिक असे सभासदांचे प्रकार असू शकतात. या प्रकारांनुसार स्वतंत्र आणि अचूक याद्या तयार कराव्यात.

सर्व सदस्यांचे पत्ते, फोन नंबर आणि ईमेल आयडी अद्ययावत आहेत की नाही, हे तपासून पाहावे. हे काम प्रामुख्याने सचिव आणि कार्यालय प्रमुख यांनी मिळून करणे गरजेचे आहे. अनेकदा काही सभासद परदेशात स्थायिक झालेले असतात, तर काही आजीव सभासदांचे निधन झालेले असते. अशा वेळी यादीतून त्यांची नावे योग्य ती काळजी घेऊन वगळणे किंवा नोंदविणे आवश्यक असते.

सर्व सभासदांना सभेची सूचना किमान १४ दिवस आधी मिळणे कायद्याने बंधनकारक आहे. त्यामुळे सुरक्षितता म्हणून किमान तीन आठवडे आधी ही नोटीस पोस्टाद्वारे 'Under Certificate of Posting' (UCP) किंवा 'Speed Post' ने पाठवावी. यामुळे नोटीस पाठविल्याचा अधिकृत पुरावा संस्थेकडे राहतो. जे सभासद जवळ राहतात, त्यांना प्रत्यक्ष नोटीस देऊन पोहोचपावती घ्यावी.

सभेच्या सूचनेतच गणपूर्तीसाठी किती सदस्यांची उपस्थिती आवश्यक आहे, याचा स्पष्ट उल्लेख असावा. सभेच्या ठरलेल्या वेळेत आवश्यक गणसंख्या उपस्थित नसेल, तर सभा ३० मिनिटांसाठी तहकूब केली जाते. त्यानंतर त्याच ठिकाणी सभा पुन्हा सुरू होते आणि अशा सभेला गणपूर्तीची कायदेशीर आवश्यकता राहत नाही, हा नियम सूचनेत लिहिणे गरजेचे आहे.

सभेचा दिवस म्हणजे संस्थेच्या लोकशाहीचा उत्सव असतो. त्यामुळे त्याचे संचालन अत्यंत पद्धतशीर आणि आदरयुक्त वातावरणात व्हावे. सुरुवातीला संस्थेच्या सचिवांनी अध्यक्षांना व्यासपीठावर स्थान स्वीकारण्याची विनंती करावी. त्यानंतर सचिवांनी उपस्थित सर्व सभासदांचे मनापासून स्वागत करावे आणि सभेचे अधिकृत सूचना पत्रक (नोटीस) सर्वांसमोर वाचून दाखवावे. त्यानंतर पत्रकातील विषयानुसार एकेका मुद्द्यावर चर्चा सुरू करावी.

गेल्यावर्षी  झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून दाखववावे. त्यावर जर कोणी योग्य बदल किंवा सुधारणा सुचविली, तर त्याची नोंद घ्यावी. हे इतिवृत्त आधीच टाईप करून सभेच्या नोटीससोबत सदस्यांना पाठवलेले असावे. जर तसे शक्य झाले नसेल, तर सभा सुरू होण्यापूर्वी बैठक स्थानी  त्याच्या प्रती सर्वांना द्याव्यात.

गेल्या  वर्षात संस्थेने नेमके काय काम केले, याचा सविस्तर वार्षिक अहवाल सभासदांसमोर मांडावा. या अहवालाची प्रतही सदस्यांना बैठक स्थळी द्यावी. हा अहवाल अधिक प्रभावी आणि माहितीपूर्ण  करण्यासाठी आजकालच्या तंत्रज्ञानाचा वापर करून 'PPT' (पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन) द्वारे तो समजावून सांगता येऊ शकतो.

मार्च अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित हिशोब पत्रके सभासदांसमोर मंजुरीसाठी ठेवावीत. यात 'Balance Sheet', 'Income and Expenditure Account' आणि त्यासोबत जोडलेली आवश्यक परिशिष्टे सर्वांना उपलब्ध करून द्यावीत. ही आर्थिक मांडणी संस्थेच्या कोषाध्यक्षांनी करावी आणि त्यावर सभासदांनी विचारलेल्या शंकांना किंवा प्रश्नांना शांतपणे, समाधानकारक उत्तरे द्यावीत.

आगामी आर्थिक वर्षाचे हिशोब तपासण्यासाठी ऑडिटरची (लेखापरीक्षक) नेमणूक करणे आणि त्यांचे मानधन ठरवणे, हा या सभेचा मुख्य विषय असतो.

ज्या वर्षी संस्थेच्या नवीन कार्यकारी मंडळाची निवडणूक असेल, त्या वर्षी विषय पत्रिकेत निवडणुकीचा विषय समाविष्ट करणे अनिवार्य आहे. तसेच, सर्वात शेवटी 'अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय' हा मुद्दा आवर्जून ठेवावा.  वेळेवर येणाऱ्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करता येईल.

वरील सर्व विषयांवर साधकबाधक चर्चा झाल्यावर रीतसर ठराव मांडले जातात. प्रत्येक ठरावावर 'सूचक' (ठराव मांडणारा) आणि 'अनुमोदक' (ठरावाला पाठिंबा देणारा) यांचे नाव लिहून, ठराव संमत झाल्यावर लगेचच त्यांच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात.

सभेला उपस्थित असलेल्या सर्व सभासदांची स्वाक्षरी उपस्थिती पुस्तकावर (Attendance Register) घ्यावी. याच वेळी सर्व सदस्यांना आवाहन करून, जर कोणाचा फोन नंबर, पत्ता किंवा ईमेल बदलला असेल, तर तशी लेखी माहिती त्यांच्याकडून फॉर्म भरून किंवा अर्जाद्वारे जागच्या जागी घ्यावी.

सभा सुरू असतानाच कार्यकारी मंडळातील एका सदस्यावर सभेतील मुख्य मुद्दे, चर्चा आणि निर्णयांची नोंद घेण्याची (Minutes टिपण्याची) विशेष जबाबदारी सोपवावी.

नाती जपणूक आणि कायदेशीर पूर्तता : किंवा -

सभा संपली की काम संपत नाही, तर खऱ्या अर्थाने जबाबदारी सुरू होते. सभेनंतर खालील गोष्टी अत्यंत तत्परतेने कराव्यात

- इतिवृत्त लेखन - सभा संपल्यापासून ८ दिवसांच्या आत सभेचे सविस्तर इतिवृत्त (Minutes) लिहून तयार करावे. त्यानंतर कार्यकारी मंडळाच्या आगामी बैठकीत त्याचे वाचन करून, काही चुका किंवा उणिवा असल्यास त्या दुरुस्त करून घ्याव्यात.
- उपस्थितांचे आभार - संस्थेवर प्रेम करून सभेला आवर्जून उपस्थित राहिलेल्या सर्व सभासदांना पुढील दोन-तीन दिवसांत फोन करून किंवा कृतज्ञता  संदेश  पाठवून त्यांचे मनापासून आभार मानावेत. यामुळे सभासदांना संस्थेबद्दल आपुलकी वाटते.
- अनुपस्थितांशी संपर्क - जे सभासद काही अपरिहार्य कारणांमुळे सभेला येऊ शकले नाहीत, त्यांच्याशी फोन किंवा ईमेलद्वारे संपर्क साधावा. सभा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्याचे सांगून, सभेत झालेल्या मुख्य निर्णयांचे आणि विषयांचे एक संक्षिप्त विवरण  त्यांना पाठवावे. यामुळे ते संस्थेशी जोडलेले राहतात.

थोडक्यात वार्षिक सर्वसाधारण सभा ही केवळ कागदोपत्री पूर्तता नसून संस्थेचा आत्मा असलेल्या सभासदांशी संवाद साधण्याचा, विश्वास दृढ करण्याचा आणि संस्थेला प्रगतीच्या पथावर पुढे नेणारा एक भक्कम पाया आहे. योग्य नियोजन आणि संवेदनशील मनाने ही सभा पार पाडल्यास संस्थेची विश्वासार्हता नक्कीच वाढीस लागते.

**- श्रीराम पटवर्धन**

**(कार्यकारिणी सदस्य, सेवावर्धिनी)**

# 5. सेवाव्रती

## 5.1 मातीच्या कणाकणात मानवतेची संजीवनी पेरणारी सेवाव्रती - डॉ. संजीवनी केळकर



आभाळाएवढी उंची लाभलेल्या माणसांनी जेव्हा जमिनीवर येऊन मातीशी नाते जोडले, तेव्हाच या देशातील वंचितांच्या आणि शोषितांच्या नशिबाला नवी दिशा मिळाली. शहरात राहून स्वतःभोवती सुखासीनतेचे कुंपण घालणे प्रत्येकालाच जमते, परंतु शहरातील सर्व सुबत्ता, वैभव आणि उच्च वैद्यकीय पदवी बाजूला सारून ग्रामीण भागातील दारिद्र्य, दुष्काळ आणि अंधाराशी दोन हात करण्याचे धारिष्ट्य मोजकेच जीव करू शकतात. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्याच्या कोरड्या, दुष्काळी मातीला आपल्या मायेने आणि कष्टाने सुजलाम् सुफलाम् करणाऱ्या डॉ. संजीवनी केळकर यांचा संपूर्ण जीवनप्रवास म्हणजे प्रतिकूलतेवर मात करून माणुसकीचा नवा इतिहास लिहिणाऱ्या एका ध्येयवेड्या माऊलीची यशोगाथा आहे. सांगोल्यातील अबालवृद्धांच्या लाडक्या आणि आदरणीय असणाऱ्या आपल्या 'संजुताई'नी हेच कठीण व्रत आपल्या अखंड परिश्रमाने आणि संवेदनशील अंतःकरणाने लीलया पेलले आहे.

सांगोला हे संजुताईंचे मूळ गाव नव्हे. पुण्याच्या एका अत्यंत सुशिक्षित आणि सुसंस्कृत घराण्यात त्यांचा जन्म झाला. आई आणि वडील दोघेही डॉक्टर असल्याने घरात सुरुवातीपासूनच सेवेचे वातावरण होते. संजुताईंचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण पुण्याच्या नामांकित शाळा-महाविद्यालयांत झाले. पुढे त्यांनी पुण्याच्याच प्रख्यात वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय पदवी संपादन केली. ज्या काळात मुलींना प्राथमिक शिक्षणासाठीही संघर्ष करावा लागत होता, त्या काळात एका तरुणीने डॉक्टर होणे हीच मुळात संपूर्ण समाजासाठी कौतुकाची गोष्ट होती.

वैद्यकीय शिक्षण पूर्ण होत आले असतानाच, एका कौटुंबिक ओळखीमधून सांगोल्याचे डॉक्टर सतीश केळकर यांच्याकडून विवाहाचा प्रस्ताव आला. मुंबईमधून उच्च वैद्यकीय शिक्षण घेतलेले डॉक्टर सतीश शहरात न थांबता आपल्या मूळ गावी म्हणजेच ग्रामीण भागात जाऊन स्थायिक होणार आहेत, हे माहीत असूनही संजुताईंनी हा निर्णय आनंदाने स्वीकारला. पुण्यात सर्व आयुष्य घालवलेली एक सुविद्य डॉक्टर मुलगी दुर्गम भागात जाऊन राहणार, या विचारानेच सुरुवातीला अनेकांच्या भुवया उंचावल्या. सांगोला परिसरात येणाऱ्या त्या पहिल्या महिला डॉक्टर होत्या, त्यामुळे या शहरी आणि सुविद्य सुनेला पाहण्यासाठी आणि तिच्याकडून उपचार घेण्यासाठी रुग्णांची गर्दी होऊ लागली. सासरच्या घरातून त्यांना मोठा सामाजिक वारसा मिळाला होता. सासरचा समृद्ध वारसा आणि पतीची खंबीर साथ यामुळे संजुताईंनी सांगोल्यात एका मोठ्या परिवर्तनाची पायाभरणी केली.

सांगोला तालुका म्हणजे मुळातच निसर्गाच्या अवकृपेने होरपळलेला दुष्काळी आणि दुर्गम भाग. भीषण दुष्काळाच्या झळांनी या भागाचे कंबरडे पार मोडून टाकले होते. पाण्याचे तीव्र दुर्भिक्ष, दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, पुरुषांमधील व्यसनाधीनता आणि आरोग्य-शिक्षणाची दुरवस्था यामुळे तिथला सामान्य माणूस होरपळून निघाला होता. त्यातही पारंपरिक पुरुषप्रधान संस्कृतीमुळे तिथली स्त्री अत्यंत असहाय्य आणि सोशिक बनली होती. संजुताईंनी तिथे आपली वैद्यकीय सेवा सुरू केली आणि अल्पावधीतच त्या महिलांच्या हक्काचे माहेर बनल्या. दवाखान्यात उपचारासाठी येणाऱ्या स्त्रिया संजुताईंच्या बोलक्या आणि मायेच्या स्वभावामुळे त्यांच्याशी आपल्या मनातील दुःख, वेदना आणि कौटुंबिक छळ मोकळेपणाने मांडू लागल्या. या संवादातून संजुताईंच्या लक्षात आले की, इथल्या स्त्रियांच्या आरोग्याची हेळसांड तर होतेच आहे, पण त्यासोबतच त्यांचे आर्थिक परावलंबित्व, पतीचे व्यसन आणि मानसिक असहाय्यता या समस्यांनी त्यांना घेरले आहे. या सर्व समस्यांचे मूळ उपसून टाकण्यासाठी केवळ औषधोपचार पुरेसे नव्हते, तर एक व्यापक सामाजिक चळवळ उभी करणे गरजेचे होते.

याच जाणीवेतून त्यांनी 'माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान' या संस्थेची स्थापना केली. ग्रामीण स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून तिच्या कुटुंबाच्या सक्षमीकरणातून स्वावलंबी समाजाची निर्मिती करणे हेच या संस्थेचे अंतिम ध्येय ठरले. शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय, आर्थिक स्वावलंबन आणि पर्यावरण या पंचसूत्रीवर काम सुरू झाले. सुरुवातीला महिला सहविचार केंद्राच्या माध्यमातून स्त्रियांमध्ये आत्मविश्वास जागवण्यात आला. किशोरवयीन मुला-मुलींवर योग्य संस्कार व्हावेत म्हणून सुट्ट्यांमध्ये विविध संस्कार वर्ग घेण्यात आले. त्याचबरोबर, ग्रामीण भागातील बालकांच्या शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी तालुक्यात अभिनव बालवाड्या सुरू करण्यात आल्या. विशेष म्हणजे, स्थानिक स्त्रियांनाच बालवाडी शिक्षिका म्हणून प्रशिक्षित केल्यामुळे अनेक महिला संस्थेशी जोडल्या गेल्या आणि त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या.

संस्थेचे काम वाढू लागले तशी आर्थिक निकड भासू लागली. सांगोल्यात दरवर्षी भरणारी जत्रा हे उत्पन्नाचे साधन बनू शकते, हे संजुताईंनी ओळखले. त्यांनी महिला कार्यकर्त्यांसमोर जत्रेत खाद्यपदार्थांचा स्टॉल लावण्याची कल्पना मांडली. सुरुवातीला ग्रामीण महिलांना वडा-पाव विकायला जत्रेत लोकांसमोर उभे राहण्याची खूप लाज वाटत होती. संजुताईंनी त्यावर एक नामी उपाय शोधला; ज्यांना लोकांसमोर यायला संकोच वाटतो, त्यांनी पडद्यामागे पदार्थ बनवावेत आणि इतरांनी ते विकावेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, महिलांची भीती घालविण्यासाठी संजुताई स्वतः जत्रेत त्या स्टॉलवर पहिल्या रांगेत उभ्या राहिल्या. एका डॉक्टर बाईला जत्रेत वडा-पाव विकताना पाहून इतर महिलांचा संकोच क्षणात गळून पडला. हा प्रयोग यशस्वी ठरला. या स्टॉलची खाद्यपदार्थांची गुणवत्ता इतकी उत्तम राखली गेली की, गावचे प्रतिष्ठित नागरिक सुद्धा तिथे मुद्दाम पदार्थ खायला येऊ लागले. संस्थेच्या कार्याला मोठा आर्थिक हातभार लागण्यास सुरुवात झाली.

स्त्रियांना कौटुंबिक छळातून मुक्त करण्यासाठी संस्थेने अन्याय निवारण समिती स्थापन केली. महिला सहविचार मंचच्या माध्यमातून अनेक पीडित महिलांना कायदेशीर व मानसिक आधार देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात आले. केवळ आधार देऊन स्त्री सक्षम होत नाही, तर तिच्या हातात पैसा असायला हवा. यासाठी संजुताईंनी त्या भागात बचतगटांची मोठी चळवळ उभी केली.आज या भागात शेकडो बचतगट कार्यरत असून महिलांना लाखो रुपयांचा पतपुरवठा केला जातो. महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी उत्कर्ष कौशल्य विकसन केंद्र सुरू करण्यात आले. इथे फॅशन डिझायनिंग, ब्युटिशियन यांसारखे कोर्सेस शिकून महिला आत्मनिर्भर बनल्या. तसेच ग्रामीण महिलांच्या सुप्त गुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यात आले.

एक डॉक्टर म्हणून संजुताईंना ठाऊक होते की, ग्रामीण स्त्रिया स्वतःच्या आरोग्याकडे कधीच लक्ष देत नाहीत. यासाठी त्यांनी खेडोपाडी हिमोग्लोबीन तपासणी शिबिरे आणि आरोग्य जागरूकता मोहीम राबविली. गावातल्याच तरुण मुलींना प्रशिक्षण देऊन 'आरोग्यदूत' बनविले आणि त्यांच्याकडे प्रथमोपचार किट सुपूर्द केली. यामुळे बाळंतपणात होणारे मातामृत्यूचे प्रमाण घटले. पाण्याच्या टंचाईमुळे महिलांना मैलोनमैल पाण्यासाठी वणवण करावी लागे. संजुताईंनी विविध संस्थांच्या मदतीने सांगोला तालुक्यात मोठे जलसंधारणाचे काम हाती घेतले. पिण्याच्या पाण्याच्या टाक्या, सिमेंट व दगडी बंधारे, पाझर तलाव बांधणे आणि कोरड्या विहिरींची दुरुस्ती करणे असे उपक्रम राबवून अनेक गावे टँकरमुक्त केली.

ग्रामीण भागातील मुलांची शाळागळती रोखण्यासाठी आणि त्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी त्यांनी उत्कर्ष विद्यालयाची स्थापना केली. अनेक हितचिंतकांनी यासाठी आपली जमीन दान दिली. श्रमप्रतिष्ठा, लोकशाही, समानता आणि पर्यावरणस्नेही मूल्यांची रुजवणूक करणाऱ्या या शाळेत इंग्रजी लॅब, संगणक कक्ष, विज्ञान प्रयोगशाळा, संगीत, क्रीडा आणि सुतारकामाचेही धडे दिले जातात. बालवाडीपासून ते उच्च माध्यमिक शिक्षणापर्यंत चालणाऱ्या या शाळेत आज हजारो विद्यार्थी उत्तम शिक्षण घेत आहेत.

डॉ. संजीवनी केळकर यांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या या बहुआयामी कामाची दखल घेऊन त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील उच्च पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. परंतु, अत्यंत विनम्र असणाऱ्या संजुताई हे पुरस्कार आपले एकटीचे न मानता आपल्या संस्थेच्या प्रत्येक कार्यकर्त्याचे आणि सभासदाचे मानतात. कधीकाळी उंबरठ्याबाहेर पाऊल न टाकणाऱ्या, वडा-पाव विकायला लाजणाऱ्या महिला आज आत्मविश्वासाने गावच्या सरपंचपदाची धुरा सांभाळत आहेत, हेच संजुताईंच्या संघर्षाचे आणि सेवेचे सुवर्णफळ आहे. ग्रामीण मातीमध्ये मानवतेची संजीवनी पेरणारी ही 'संजुताई' नावाची माऊली खऱ्या अर्थाने लाखो कुटुंबांचा आधारवड ठरली आहे.

**(वरील तपशील बाया कर्वे स्त्री अभ्यास केंद्र , महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे यांच्या ' कर्त्या करवित्या ' या पुस्तकातून घेतला आहे.)**

# 5.2 वंचितांच्या आयुष्यात प्रकाशपहाट आणणारी माऊली - अनुराधा भोसले



ज्यांच्या नशिबात जन्मापासूनच केवळ उपेक्षा, दारिद्र्य आणि अंधार लिहिला गेला आहे, अशा हातांमध्ये जेव्हा एखादी व्यक्ती पाटी आणि पेन्सिल देऊन त्यांच्या भविष्याला नवी दिशा देते, तेव्हा एका नव्या युगाची सुरुवात होते. कोल्हापूरच्या तांबड्या मातीत आणि वीटभट्ट्यांच्या धुराड्यातून निघणाऱ्या काजळीत वंचितांच्या मुलांचे भविष्य शोधणाऱ्या, बालमजुरीच्या भयंकर दलदलीतून हजारो कोवळ्या जीवांची सुटका करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या अनुराधा भोसले यांचे संपूर्ण जीवन म्हणजे संघर्षातून उगम पावलेल्या एका पवित्र ध्येयाचे महाकाव्य आहे. स्वतःच्या आयुष्यातील प्रत्येक दुःखाला, अपमानाला आणि जखमेला त्यांनी समाजाच्या कल्याणासाठी एका समिधेत बदलले. आज त्यांच्या याच अलौकिक, अंगावर काटा आणणाऱ्या प्रवासाची अंतर्मुख करणारी प्रेरणादायी गाथा.

अनुराधाताईंचे मूळ गाव अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर जवळ असलेले भोकर. त्यांचे वडील प्राथमिक शिक्षक होते, तर आई अशिक्षित होती. घरात एकूण बारा भावंडांचा गराडा आणि त्यामध्ये अनुराधाताईंचा क्रमांक अकरावा. एवढ्या मोठ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे आणि सर्वांना शिक्षण देणे म्हणजे पालकांसाठी जणू एका विस्तवावरून चालण्यासारखे होते. घरात गरिबीचे सावट असल्याने कष्टाचे धडे त्यांना लहानपणीच मिळाले.

त्यांचा बालपणीचा नित्यक्रम अत्यंत खडतर होता. दिवसभर शाळेत जायचे आणि संध्याकाळी शिक्षकांच्या घरची कामे करायची. पण मनात शिक्षणाची तीव्र जिद्द होती. याच जिद्दीच्या जोरावर त्यांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. सुट्ट्यांच्या काळात त्यांनी स्वतः गावी जाऊन शेतामध्ये मजुरी केली आणि त्या घामाच्या पैशातून पुढच्या परीक्षेची फी भरली. पुढील शिक्षणासाठी त्या श्रीरामपूरला गेल्या तेव्हा परिस्थिती आणखी बिकट झाली. तिथल्या एका संस्थेत त्या साफसफाईचे काम करू लागल्या. या कष्टाच्या बदल्यात त्यांना केवळ दोन वेळचे जेवण मिळाले. पण परिस्थिती कशीही असो, माझे शिक्षण थांबणार नाही हा त्यांचा निश्चय होता.

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर अनुराधाताईंनी समाजकार्य या विषयात पदवी घेण्याचे स्वप्न पाहिले. खिशात दमडी नसताना आणि कोणताच आधार नसताना त्यांनी थेट मुंबई गाठली. सुरुवातीचे काही दिवस तर त्यांच्याकडे राहण्यासाठी हक्काची जागाही नव्हती, त्यामुळे त्यांना रेल्वे स्टेशनवर रात्री काढाव्या लागल्या. इच्छा तिथे मार्ग त्या काढत गेल्या. पुढे त्यांना मुंबईतील एका प्रख्यात संस्थेत प्रवेश मिळाला. तिथे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राहून त्यांनी समाजकार्याची पदवी संपादन केली.

या शिक्षणाच्या बळावर त्यांनी विविध शहरांमध्ये काम करायला सुरुवात केली. पण केवळ नोकरी करणे आणि स्वतःचे पोट भरणे हा त्यांचा उद्देश नव्हता. एखाद्या समस्येच्या मुळाशी जाऊन तिचे संपूर्ण उच्चाटन करणे ही त्यांची आंतरिक ऊर्मी होती. समाजातील शेवटच्या, पिचलेल्या आणि वंचित घटकाला हक्काचा न्याय मिळवून देता येईल.यासाठी काम करायचे हे त्यांनी ठरविले.

त्याच सुमारास त्यांचा विवाह झाला आणि त्यांना एका विकास संस्थेत नोकरी मिळाली. या संस्थेच्या संस्थापकांच्या बहुआयामी कामांतून अनुराधाताईंना खूप शिकायला मिळाले. समाजातील वंचित घटकांसाठी असणारी तळमळ आणि मार्गदर्शकांमुळे अनुराधाताईंच्या सामाजिक कार्याला एक निश्चित दिशा मिळाली. त्या दिवसेंदिवस नवनवीन आव्हाने झेलत काम करत होत्या. त्यांच्या कार्याचा विस्तार वेगाने वाढत होता. पण दुर्दैवाने, वैयक्तिक आयुष्यात मात्र त्यांच्या वाट्याला प्रचंड क्लेश आले.

सासरच्या मंडळींना त्यांचे हे समाजकार्य मुळीच मान्य नव्हते. घरातल्या सगळ्या जबाबदाऱ्या योग्य पद्धतीने पार पाडूनही त्यांना अत्यंत अपमानास्पद वागणूक मिळाली. प्रसंगी क्रूर शारीरिक मारहाणही सोसावी लागली. दुसरीकडे, पतीची त्यांना कोणतीच साथ नव्हती दोन लहान मुलांचे पालकत्व त्या एकट्याच निभावत होत्या.कौटुंबिक छळाच्या अत्यंत वेदनादायी परिस्थितीत अनुराधाताईंनी एक अत्यंत कठोर निर्णय घेतला. आपल्या स्वाभिमानासाठी आणि मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी एका रात्री, केवळ नेसत्या वस्त्रानिशी पतीचे घर कायमचे सोडले.

घर सोडल्यानंतर त्यांच्या आयुष्यात एका वेगळ्याच पातळीवर संघर्ष सुरू झाला. एकीकडे दोन लहान मुलांची संपूर्ण जबाबदारी आणि दुसरीकडे न्यायालयातील प्रक्रिया. अशा परिस्थितीत त्यांच्या मार्गदर्शकांनी त्यांना कोल्हापुरात काम सुरू करण्याची परवानगी दिली. अनुराधाताईंमधील आंतरिक ताकद ओळखायला मदत करणारे हे मार्गदर्शक त्यांच्या सर्व संघर्षात पाठीशी ठाम उभे राहिले.

कोल्हापूरसारख्या पुरोगामी विचारांच्या शहरात आल्यावर अनुराधाताईंच्या विचारांना नेमकी दिशा मिळाली. त्यांनी वर्गसंघर्ष आणि शोषितांचे प्रश्न जवळून समजून घेतले. वंचितांच्या मुलांचे कल्याण हाच त्यांचा ध्यास बनला. वीटभट्टी कामगारांच्या मुलांसाठी शाळा सुरू करण्यापासून त्यांची खरी क्रांती सुरू झाली. वीटभट्ट्यांवर काम करणारे कामगार स्थलांतरित असतात, त्यामुळे त्यांच्या मुलांचे शिक्षण थांबते आणि कोवळी मुलेही मजुरी करू लागतात. हे शोषण थांबविण्यासाठी त्यांनी थेट वीटभट्टीवरच शाळा सुरू केली.

त्यांच्या संस्थेचे नाव 'अवनी' असे ठेवण्यात आले. अन्न, वस्त्र आणि निवारा या माणसाच्या तीन मूलभूत गरजा आहेत. माणूस तांत्रिकदृष्ट्या कितीही पुढे गेला तरी या गोष्टींशिवाय त्याची प्रगती होत नाही, आणि या गोष्टींपासून वंचित असलेला मोठा समाज आजही जगत आहे, याची जाणीव ठेवून हे कार्य अविरतपणे सुरू झाले.






स्थलांतरित बालकांसाठी त्यांचा 'वीटभट्टी प्रकल्प' अत्यंत यशस्वीपणे सुरू आहे. लहान मुलांसाठी भट्ट्यांवर डे केअर सेंटर्स चालविली जातात, तर मोठ्या मुलांना जवळच्या जिल्हा परिषद शाळेत पाठवले जाते. तिथले एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये, असा अनुराधाताईंचा प्रामाणिक प्रयत्न असतो. त्यासाठी दरवर्षी एक मोठे सर्वेक्षण केले जाते आणि त्यानुसार शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून मुलांना शिकवून पुन्हा त्यांच्या मूळ शाळेत पाठवले जाते, या कार्यात त्यांना अनेक दानशूर व्यक्ती आणि सहकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

बालकामगार आणि बाल भिक्षेकरी यांच्यासाठी अनुराधाताईंची दिवसभर भटकंती सुरू असायची. सुरुवातीला स्वतःच्या मुलांचा विचार न करता, तहान-भूक विसरून त्या बालकामगारांची सुटका करण्यासाठी रस्तोरस्ती फिरायच्या. शासकीय यंत्रणांना सोबत घेऊन गॅरेज, हॉटेल्स, बांधकाम साईट्सवर छापे टाकून त्या मुलांची मुक्तता करतात. एखादे मूल दिसले की, त्याच्याशी प्रेमाने बोलायचे, त्याच्यात शिकण्याची इच्छा असेल तर मालकाशी भांडून त्याची नोकरीतून मुक्तता करायची, हा त्यांचा बाणा आहे.

या कामाच्या जोडीलाच त्यांनी कचरावेचक महिला, भटके विमुक्त आणि दुर्लक्षित समाजाच्या वस्त्यांवर शाळा आणि अभ्यासिका सुरू केल्या. अनाथ आणि वंचित मुलींसाठी त्यांनी 'अवनी बालगृह' सुरू केले. अनेक अडचणींवर मात करत आज या बालगृहात अनेक मुली अत्यंत आनंदाने शिक्षण आणि स्वावलंबनाचे धडे घेत आहेत. बालगृहात येणाऱ्या प्रत्येक मुलीला आईचे प्रेम देणाऱ्या अनुराधाताईंनी अनेकांचे कन्यादान करून त्यांचे संसारही थाटून दिले आहेत.

अनुराधाताईंचे कार्य जागतिक पातळीवर पोहोचले. समाजातील पीडित, विधवा आणि परितक्त्या महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांनी 'एकटी' ही संस्था सुरू केली. विधवा महिलांना निवृत्ती वेतन मिळवून देण्यासाठी त्यांनी मोर्चे काढले आणि हजारो महिलांना न्याय मिळवून दिला. तसेच हजारो कचरा वेचक महिलांचे बचत गट तयार करून त्यांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण दिले.

अनुराधा भोसले यांच्या उत्तुंग कार्याची दखल घेऊन त्यांना आजवर अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. विविध राष्ट्रीय दूरचित्रवाणी वाहिन्यांवर त्यांच्या या कार्याचा गौरव करण्यात आला.

ज्या स्त्रीला स्वतःच्या वैयक्तिक आयुष्यात संघर्षाशिवाय काहीच मिळाले नाही, जिने बालपणी मोलमजुरी केली, तिने आज लाखो वंचित मुलांना आणि महिलांना सन्मानाचे आयुष्य मिळवून दिले आहे. अनुराधाताईंच्या रूपात आज एक अशी माऊली लाभली आहे, जिने दुःखाच्या काळोखावर माणुसकीच्या प्रकाशाने मात केली आहे. त्यांचे आयुष्य सामान्य माणसाला संकटांशी लढण्याची आणि जगाला प्रकाशमान करण्याची अखंड स्फूर्ती देत राहणारे आहे. स्वतःचे अश्रू न दाखवता ज्या हातांनी लाखो वंचितांचे अश्रू पुसले, त्या माऊलीच्या धैर्याला त्रिवार वंदन.

**(वरील तपशील बाया कर्वे स्त्री अभ्यास केंद्र , महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे यांच्या ' कर्त्या करवित्या ' या पुस्तकातून घेतला आहे.)**

# 6. सेवा वार्ता

## 6.1 सहयोगी संस्थांसाठी संधी,संसाधने आणि सहयोगाचे व्यासपीठ - सेवावर्धिनी




प्रत्येक मुठीत माणुसकी, प्रत्येक दाण्यात आशेचा किरण!

एक मुठ्ठी अनाज अभियान : लोकसहभागातून अन्नसुरक्षेकडे वाटचाल.

समाजातील प्रत्येक घटकाला पुरेसे आणि पोषक अन्न मिळणे हा मूलभूत मानवी हक्क आहे. तथापि, आजही अनेक वृद्धाश्रम, अनाथालये, निवासी शाळा आणि इतर निवासी संस्था मर्यादित साधनसंपत्तीमुळे त्यांच्या दैनंदिन अन्नाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी संघर्ष करत आहेत. या पार्श्वभूमीवर सेवावर्धिनीने सुरू केलेले "एक मुठ्ठी अनाज अभियान" हे लोकसहभागातून राबविले जाणारे संवेदनशील, समाजकेंद्री आणि परिणामकारक अभियान आहे.

या अभियानाचा मुख्य उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल संस्थांना दरमहा अन्नधान्य साहाय्य उपलब्ध करून देणे हा आहे. नियोजनबद्ध धान्य संकलन आणि पारदर्शक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून समाजातील सक्षम नागरिक आणि गरजू संस्था यांच्यात संवेदनशीलतेचा मजबूत दुवा निर्माण करण्याचे कार्य हे अभियान सातत्याने करत आहे. हे केवळ अन्नधान्य संकलनापुरते मर्यादित नसून, समाजात देण्याची वृत्ती, सामाजिक जबाबदारी आणि परस्पर सहकार्याची भावना रुजविणारे लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त करत आहे.

सेवावर्धिनीने २०२१मध्ये पिंपरी-चिंचवड परिसरात या अभियानाची सुरुवात केली. 'प्रत्येक घरातून एक मुठ अन्नधान्य' या साध्या परंतु प्रभावी संकल्पनेवर आधारित या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पुढे या अभियानाचा विस्तार कोथरूड तसेच पुणे परिसरातील विविध गृहनिर्माण संस्थांपर्यंत झाला. हे अभियान पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील लोकसहभागाचे एक यशस्वी मॉडेल म्हणून विकसित झाले आहे.

### अभियानाचे स्वरूप

अभियानांतर्गत नागरिकांना दरमहा किमान एक किलो अन्नधान्य देण्याचे आवाहन केले जाते. गहू, तांदूळ, डाळी, साखर, तेल यासारख्या जीवनावश्यक वस्तूंचे संकलन करून त्या गरजू संस्थांपर्यंत पोहोचवल्या जातात. सोसायटी, वसाहती आणि स्थानिक परिसरांच्या माध्यमातून धान्य संकलनाचे नियोजन व समन्वय केला जातो. त्यामुळे गरजू संस्थांना नियमित आणि पोषक असा धान्याचा पुरवठा होण्यास मदत मिळते.

या अभियानाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या अभियानाशी १६० हून अधिक गृहनिर्माण संस्था जोडल्या गेल्या असून ३३,५०० पेक्षा अधिक कुटुंबांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला आहे. लोकसहभागातून तब्बल ३ लाख ५१ हजार २७० किलो अन्नधान्याचे संकलन करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये ८३० स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला असून १०० हून अधिक गरजू संस्था, अनाथालये, निवासी शाळा आणि वृद्धाश्रमांना नियमित अन्नधान्य सहाय्य मिळाले आहे.

पिंपरी-चिंचवड परिसरात २०२१ पासून ९० पेक्षा अधिक सोसायट्यांच्या माध्यमातून ३ लाख २० हजार २७० किलो अन्नधान्य संकलित झाले आहे. कोथरूड परिसरात २०२४ पासून ४५ पेक्षा अधिक सोसायट्या अभियानाशी जोडल्या गेल्या असून २३ हजार किलो अन्नधान्याचे संकलन झाले आहे. तसेच २०२५ पासून विविध रोहन बिल्डर गृहनिर्माण संस्थांमधून आठ हजार किलो अन्नधान्य जमा करण्यात आले आहे. या सर्व प्रयत्नांमुळे अन्नसुरक्षेची सक्षम आणि शाश्वत व्यवस्था निर्माण होत आहे.

### अभियानाचे उद्दिष्ट

या अभियानाचे उद्दिष्ट केवळ अन्नधान्य पुरविण्यापुरती मर्यादित नाही. गरजू संस्थांना नियमित अन्नसहाय्य उपलब्ध करून देणे, नागरिकांना अन्नदानासाठी प्रेरित करणे, वंचित घटकांची अन्नसुरक्षा बळकट करणे तसेच समाजात संवेदनशीलता आणि देण्याची (दानाची) संस्कृती विकसित करणे आदी व्यापक उद्दिष्टे आहेत. नागरिकांनी नागरिकांसाठी उभा केलेला हा उपक्रम सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव अधिक दृढ करतो.

विशेष म्हणजे, हे अभियान संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी (Sustainable Development Goals - SDGs) सुसंगत आहे. एस. डी. जी २ (झिरो हंगर) या उद्दिष्टानुसार सर्वांना सुरक्षित, पोषक आणि पुरेसे अन्न उपलब्ध करून देणे आणि अन्नसुरक्षा बळकट करणे यावर भर दिला जातो. तसेच एस. डी. जी. १७ (पार्टनरशिप फॉर गोल्स) या उद्दिष्टानुसार संस्था, स्वयंसेवक, नागरिक आणि विविध भागीदार यांच्या सहकार्याद्वारे शाश्वत विकास साध्य करण्याचे महत्त्व अधोरेखित केले जाते. 'एक मुठ्ठी अनाज' अभियान या दोन्ही उद्दिष्टांची प्रभावी अंमलबजावणी करणारे उदाहरण ठरले आहे.





आजच्या काळात अन्नसुरक्षा ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक घरातून एक मुठ अन्नधान्य देण्याच्या छोट्या कृतीतून अनेक गरजू मुलांना, वृद्धांना आणि निवासी संस्थांना आधार मिळू शकतो. लोकसहभागातून उभारलेली ही अन्नसुरक्षेची साखळी समाजात परस्पर सहकार्याची नवी प्रेरणा निर्माण करते.

भविष्यात अधिकाधिक सोसायट्या, स्वयंसेवक आणि सामाजिक संस्थांना या अभियानाशी जोडून त्याचा विस्तार करण्याचा सेवावर्धिनीचा मानस आहे. अन्नधान्य सहाय्याचा लाभ अधिकाधिक गरजूंपर्यंत पोहोचविणे, अन्नसुरक्षेची मजबूत साखळी उभारणे आणि "कोणीही उपाशी राहू नये" हा विचार प्रत्यक्षात आणणे हीच या अभियानाची पुढील दिशा आहे.

'प्रत्येक घरातून एक मुठ अन्न - हजारो आयुष्यांना आधार' या विचारातून सुरू झालेला हा उपक्रम समाजातील संवेदनशीलतेचा, सहकार्याचा आणि लोकशक्तीचा प्रेरणादायी आदर्श ठरला आहे.

## एक मूठी अन्न अभियान (मे - जून २०२६)

| क्र. | महिना | संस्थेचे नाव | धान्य (Kg) |
|---|---|---|---|
| १. | मे 2026 | आदिवासी समीकरण अनाथ सेवा परिवार, वासनवाडी, बीड | 1737 kg |
| २. | मे 2026 | विश्व हिंदू केंद्र संचलित वनवासी कल्याण आश्रम, चिखलगाव, दापोली, रत्नागिरी | 439.3 kg |
| ३. | जून 2026 | रसाईदेवी प्राथमिक आश्रमशाळा, वरवंड, दौंड | 439.3 kg |

# सेवावार्ता

## संपादक मंडळ

श्री. सोमदत्त पटवर्धन - कार्यवाह
श्री. विक्रम पंडित – कार्यकारिणी सदस्य
श्री. गिरीश देगावकर - मुख्य कार्यकारी अधिकारी
सौ. गिरीजा सिरशीकर - महाव्यवस्थापक

सेवावर्धिनी

सेवावर्धिनी – एक विश्वासार्ह सहकारी